<u>आयुक्त, अपंग कल्याण पद निर्मितीबाबत...</u>

महाराष्ट्र शासन,
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय :इडीई-१०९६/४७४३/प्र.क्र.६६६/सुधार-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०००.

<u>प्रस्तावना :-</u> अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हा कायदा अमलात आलेला असून या कायद्याच्या विविध तरतूदींनुसार अपंग व्यक्तींच्या कल्याणाच्या विविध योजना तयार करण्याचे अभिप्रेत आहे.त्याचप्रमाणे अपंग व्यक्तींच्या प्रचलित योजनांचे संनियंत्रण करणे या दृष्टीने या कायद्याच्या कलम ६० (१) नुसार आयुक्त, अपंग कल्याण यांची नेमणूक करावी अशी तरतूद केलेली असून कलम ६० (४) नुसार [illegible] अनुषंगिक पदांची निर्मिती करावी अशीदेखील तरतूद आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ च्या कलम ६० (१) च्या तरतुदीनुसार आयुक्त, अपंग कल्याण यासाठी स्वतंत्र पद व त्यास सहाय्यकारी पदांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयातील उप संचालकाचे १ पद (जात प्रमाणपत्र तपासणी) समर्पित करण्यात येत असून त्याऐवजी अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ च्या कलम ६० (१) च्या तरतुदीनुसार आयुक्त, अपंग कल्याण पद निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच आयुक्त, अपंग कल्याण यांच्या कार्यालयात खाली नमूद केल्याप्रमाणे सहाय्यकारी पदे समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयातून समायोजनाने नियुक्त करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. आयुक्त, अपंग कल्याण हे पद भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ वेतनश्रेणी (रु.१०,६५०-३२५-१५,८५०) अथवा मंत्रालयातील उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यातून भरण्यात यावे.

३. आयुक्त, अपंग कल्याण या पदास सहाय्यकारी अशी खालील पदे निर्माण करण्यात यावीत व ती संचालक, समाजकल्याण यांच्या आस्थापनेवरील उपलब्ध पदांमधून समायोजनाने भरण्यात यावीत :-

पदनाम	पदांची संख्या
उपायुक्त (उपसंचालक/अवर सचिव)	१
अधीक्षक	१
निरिक्षक	१
उच्चश्रेणी लघुलेखक	१
लिपिक टंकलेखक	१
शिपाई	१
एकूण	६

४ आयुक्त, अपंग कल्याण यांना उपलब्ध वाहनातून एक वाहन व वाहनचालक संचालक समाजकल्याण यांच्या कार्यालयातून देण्यात यावा.

५. या पदासाठी दूरध्वनी, स्टेशनरी, दौरे यासाठी रु. एक लाख इतका आवर्ती व संगणक प्रिंटर खरेदी, दूरध्वनी डिपॉझिट, फर्निचर इत्यादिसाठी रु. १,५०,००० इतक्या अनावर्ती [illegible] देण्यात येत आहे.

६. <u>कार्यकक्षा व जबाबदारी</u> :- अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ चे कलम ६० (१) नुसार वरील पद "आयुक्त अपंग कल्याण" म्हणूनअस्तित्वात राहील. कलम ६१ मध्ये नमूद करण्यात आलेली जबाबदारी सदर आयुक्त यांच्या कार्यालयास पार पाडावी लागेल. [illegible] गांशी संपर्क साधून अपंगांच्या विविध योजनांचे संनियंत्रण करणे, राज्य शासनाने अपंग कल्याणाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे नियंत्रण करणे, अपंगांच्या हक्कांचे संरक्षण करुन त्यांना योग्य त्या सवलती उपलब्ध [illegible] देण्यासाठी प्रयत्नशील राहणे. राज्य शासनास अपंग कायदा १९९५ च्या अंमलबजावणीबाबत अहवाल सादर करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील. सदर कार्यालय स्वतंत्ररित्या केवळ अपंग कायद्यातील तरतुदी यांच्या अंमलबजावणीकरीता कार्यरत राहील. त्याचप्रमाणे आयुक्त,अपंग कल्याण हे तक्रार निवारण अधिकारी म्हणून या कायद्यांतर्गत कार्यरत असल्यामुळे एखाद्या प्रकरणात संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द [illegible]विषयक कार्यवाही सूचित केल्यास अथवा इतर काही आदेश/निदेश दिल्यास त्याचे अनुपालन संबंधीत विभाग प्रमुखांना / अधिकाऱ्यांना करावे लागेल.

७. आयुक्त, अपंग कल्याण यांचे प्रशासकीय कार्यालय पुणे येथे राहील तसेच सदर पद सचिव, समाजकल्याण यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील. याबाबत होणारा खर्च २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ००, संचालक व प्रशासन (एक)(ए) समाजकल्याण संचालनालय (२२३५ ०७१ २) लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: प्र.क्र. २३९/२०००, व्यय-११ , दिनांक ६.०३.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.सं. इंदूलकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव.
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मा.मंत्री(समाजकल्याण) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (समाजकल्याण) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी.
महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
वित्त विभाग,(व्यय११/ अर्थसंकल्प-२), मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी,(अर्थसंकल्प) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग.
निवड नस्ती/सुधार-२.
* पत्राने.